आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - ३.०० वाजता

२६ जून २०२४ - बुधवार

विधान परिषदेच्या ४ जागांसाठी आज मतदान होत आहे. **मुंबई आणि कोकण** पदवीधर तसंच नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांचा यात समावेश आहे. दुपारी१ वाजेपर्यंत मुंबई पदवीधर मतदारसंघात ३८ पूर्णांक ४दशांश टक्के, तर मुंबई शिक्षक मतदारसंघात ४० पूर्णांक ४८ शतांश टक्के मतदान झालं होतं. **कोकण** पदवीधर मतदारसंघात ३५ पूर्णांक ६५ शतांश टक्के, तर **नाशिक** शिक्षक मतदारसंघात ४३ पूर्णांक ४७ शतांश टक्के मतदान झालं आहे.

मतमोजणी १ जुलै रोजी होणार आहे. या चारही विधानपरिषद मतदारसंघांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदारांचा कार्यकाळ येत्या ७ जुलै रोजी संपणार आहे.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून म्हणजेच २७ जूनपासून सुरू होणार आहे. हे अधिवेशन १२ जुलैपर्यंत चालेल. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये मांडण्यात येईल. पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज संध्याकाळी सह्याद्री अतिथीगृहात चहापानाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर राज्य मंत्रीमंडळाची बैठक होईल.

**<><><><><>**

विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारनं आयोजित केलेल्या चहापानावर बहिष्काराचा निर्णय विरोधी पक्षांनी घेतला आहे. हे सरकार शेतकरीविरोधी असून मुख्यमंत्री, आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आपल्या राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी केंद्रात आवाज उठवत नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. विरोधी पक्षांच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठीचे प्रस्ताव केंद्राला पाठवण्यात राज्य सरकारने विलंब केल्यामुळे त्यांना मदत मिळाली नाही, असा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी आणि वीज बिल माफी करावी अशी मागणी

या अधिवेशनात करणार असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.राज्यात CAA आणि NRC लागू होऊ देणार नाही, असंही ते म्हणाले.

<><><><><>

भाजपाचे ज्येष्ठ खासदार ओम बिर्ला यांची आज लोकसभेच्या सभापतीपदी सलग दुसऱ्यांदा निवड झाली. निवड झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस नेता राहुल गांधी आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बिर्ला यांचं अभिनंदन केलं आणि त्यांना आसनापर्यंत नेलं.

बिर्ला यांची दुसऱ्यांदा निवड होण्यानं इतिहास रचला गेल्याची प्रतिक्रिया मोदी यांनी व्यक्त केली. बिर्ला यांच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाची विधेयकं लोकसभेत मंजूर झाल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांच्या कार्यकाळात ९७ टक्के विधायक काम झाल्याचं मोदी म्हणाले. संसद सदस्यांची वर्तणूक आणि उत्तरदायित्व यामुळे जनतेचा संसदीय लोकशाहीवरचा विश्वास वाढतो, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

तत्पूर्वी आज लोकसभेचं कामकाज सुरू होताच मोदी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या इतर नेत्यांनी बिर्ला यांची सभापतीपदी निवड करण्यासाठीचा प्रस्ताव ठेवला होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे आणि समाजवादी पक्षाचे आनंद भदौरिया यांनी काँग्रेसचे सभापतीपदासाठीचे उमेदवार कोदिकुन्निल सुरेश यांना अनुमोदन देणारा प्रस्ताव मांडला. पण विरोधी पक्ष मतदानाविषयी आग्रही न राहिल्यामुळे बिर्ला यांची निवड आवाजी मतदानानं करण्यात आली. बिर्ला यांची दुसऱ्यांदा लोकसभापती पदासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव संमत करुन लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या एकशेपन्नासाव्या जयंती दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन इथं  छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार  यांनीही  शाहू महाराज यांना समाजमाध्यमांवर आदरांजली वाहिली आहे. कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी शाहू महाराजांचे जन्मस्थळ असणाऱ्या  लक्ष्मी विलास पॅलेस' इथल्या शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केल. ऐतिहासिक दसरा चौक येथे १९२७ साली बांधलेल्या शाहू महाराजांच्या पुतळ्याचं  पूजन करुन पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केलं

शाहू महाराज यांचा जन्मदिवस 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त कोल्हापूर मध्ये शोभा यात्रा आणि  समता दिंडीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

लोकसभेच्या सभापतीपदासाठी काँग्रेसनं उमेदवार उभा केल्याबद्दल केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज टीका केली. ते संसदेबाहेर वार्ताहरांशी बोलत होते. उपसभापतीपदासाठी सरकार चर्चेला तयार आहे मात्र त्यासाठी पूर्वअटी घालणं योग्य नाही असंही ते म्हणाले. लोकसभा सभापतीपदासाठी विरोधी पक्षांनी दबावाचं राजकारण केल्याची टीका केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंग यांनी केली. सरकारनं या मुद्द्यावर कोणतीही चर्चा केली नाही, असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**